## <u>प्रेस नोट</u>

### "मिळकतकराचा भरणा करणेकामी पुणे महानगरपालिका अंतर्गत नागरी सुविधा केंद्र (CFC) दि. ०२ मे २०२६ ते दि. ३१ मे २०२६ पर्यंत साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील सुरु असणार आहेत"

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना मिळकतकर भरणा करणे सुकर व्हावे यास्तव विविध क्षेत्रिय कार्यालय व संपर्क कार्यालयांतर्गत नागरी सुविधा केंद्र (CFC) चालू करण्यात आले आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील मिळकतकरामधील ५ ते १०% सवलतीची मुदत दि. ३१ मे २०२६ रोजी संपत येत आहे. त्यामुळे सदर कालावधीत मिळकतकर भरणा करावयास नागरिकांची गर्दी होते. तसेच ज्या मिळकतधारकांना अद्यापही मिळकतकराचे बिल प्राप्त झाले नाही त्यांनी नजीकच्या क्षेत्रिय कार्यालय व संपर्क कार्यालयात जाऊन मिळकतकर देयके प्राप्त करून भरणा करावा.

मिळकतकराचा भरणा करणे नागरिकांना सोयीस्कर होणेकामी पुणे महानगरपालिका अंतर्गत सर्व नागरी सुविधा केंद्र (CFC) संपर्क कार्यालये दि. ०२ मे २०२६ ते दि. ३१ मे २०२६ या कालावधीत सोमवार ते शनिवार स. ०९.०० ते सां. ०५.०० तसेच रविवार व शासकीय/सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी स.९.०० ते दु. २.०० वा. सुरु ठेवण्यात येणार आहे.

नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने मिळकतकराचा भरणा <u>propertytax.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर करता येईल.

तरी ज्यांनी मिळकतकराचा भरणा अद्यापपर्यंत केलेला नाही त्यांना आवाहन करण्यात येते की, विहित मुदतीत मिळकतकराचा भरणा करून सहकार्य करावे.

29.4.26

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका